महाराष्ट्र पोलीस

**प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना.**
झाशी राणी पुतळ्या समोर, जे.ई.एस. कॉलेज रोड,
जालना - ४३१ २०३ दूरध्वनी/फॅक्स : ०२४८२-२३०६०८

जा.क्र.प्रबंधक/पो.प्र.केंद्र.जालना/साहित्य निर्लेखन/जाहिरात/प्रसिध्दी/ 3768

जालना.दि.14/07/2025.
15 JUL 2025

प्रति.

मा.संचालक.
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय.
07 वा मजला. रुम क्र.719.
मंत्रालय.मुंबई.

संदर्भ :- 01.महाराष्ट्र शासन.वित्त विभाग परिपत्रक क्र.डीएफपी-1016/प्र.क्र.07/16/विनियम, दि.22/06/2016.
02.जा.क्र.प्रबंधक/पो.प्र.केंद्र,जालना/साहित्य निर्लेखन/जाहिरात/प्रसिध्दी/2584,जालना.दि.14/05/2025.

विषय :- पोलीस प्रशिक्षण केंद्र,जालना येथील जुन्या साहित्याचे निर्लेखनाची जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

---000---

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये,पोलीस प्रशिक्षण केंद्र,जालना येथील जुने/निरुपयोगी/वापरण्यास अयोग्य स्थितीमधील बाकडे (स्टील+लाकडी), स्टील कपाट, इलेक्ट्रीक/इलेक्ट्रॉनिक साहित्य (संगणक प्रिंटर,मॉनिटर,कलर प्रिंटर, झेरॉक्स मशिन, इ.) . भोजनालयातील किचन साहित्य (स्टील,अॅल्युमिनियम, स्टेनलेस स्टील इ.) लाकडापासुन बनविलेले प्रशिक्षण साहित्य, लाकडी टेबल, क्रिडा साहित्य,वाद्य/बँड साहित्य,प्लास्टिक साहित्य (टोपले,पाण्याचे जार,टाकी इ.) इत्यादी साहित्याचे निर्लेखन करण्याचे अनुषंगाने विक्री करावयाची आहे. सदरील साहित्य खुल्या निविदा/दरपत्रके मागवुन अधिकृत खरेदीदार फर्मधारक यांना विक्री करावयाचे असल्याने उपरोक्त संदर्भ क्र.02 अन्वये, यापुर्वी जाहिरात प्रसिध्दीकरीता या कार्यालयाकडुन पत्र देण्यात आलेले असुन त्यानुसार शासनाचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द झालेली आहे.तथापि, काही खरेदीदार यांना दरपत्रक सिकृती पत्रे देऊन सुध्दा त्यांनी साहित्य खरेदी करण्यास नकार दिल्याने नव्याने दिनांक 15/07/2025 ते **30**/07/2025 या कालावधीमध्ये जाहिराती प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

तरी या पत्रासोबत जोडल्याप्रमाणे पोलीस प्रशिक्षण केंद्र,जालना या घटकाची साहित्य विक्री करणेबाबतची जाहिरात शासनाचे संकेतस्थळावर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

सोबत :- 01.जाहिरातीचा मसुदा.
02. दरपत्रके सादर करण्याकरीता विहित नमुन्यातील अर्जाचा नमुना.
03. साहित्य विक्री करणेबाबतच्या अटी व शर्ती.

( अशोक बनकर )
प्राचार्य,
**पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना.**

प्रत,

निर्लेखन समिती सदस्य.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना.**
झाशी राणी पुतळ्या समोर, जे.ई.एस. कॉलेज रोड,
जालना - ४३१ २०३ दूरध्वनी/फॅक्स : ०२४८२-२३०६०८
संकेतस्थळ :-WWW.PTCJALNA.COM
ईमेल आयडी :- prin.ptsjalna@mahapolice.gov.in

**पोलीस प्रशिक्षण केंद्र,जालना.** जा.क्र.3378 दि.14/07/2025

पत्ता- दुर्गामाता मंदिर परिसर,जे.ई.एस. कॉलेज रोड, झांशीची राणी पुतळयासमोर,जालना. 15 JUL 2025

# जाहिरात

## पोलीस प्रशिक्षण केंद्र,जालना या कार्यालयातील निरुपयोगी साहित्याचे निर्लेखन / विक्री करणे बावत.

पोलीस प्रशिक्षण केंद्र,जालना या कार्यालयातील जुने/ निरुपयोगी/वापरण्यास अयोग्य स्थितीमधील जुने पलंग,बाकडे (स्टील+लाकडी), स्टील कपाट, इलेक्ट्रीक साहित्य (पंखे,विद्युत पंप इ.),भोजनालयाती किचन साहित्य (स्टील,ॲल्युमिनियम, स्टेनलेस स्टील इ.) लाकडापासुन बनविलेले प्रशिक्षण साहित्य, लाकडी टेबल, क्रिडा साहित्य,वाद्य/बँड साहित्य,प्लास्टिक साहित्य (टोपले,पाण्याचे जार,टाकी इ.), झेरॉक्स मशिन,संगणक मॉनिटर, इत्यादी साहित्याचे निर्लेखन करण्याचे अनुषंगाने विक्री करावयाची आहे. सदरील साहित्य पाहण्यासाठी दिनांक 15/07/2025 ते दिनांक 30/07/2025 या कालावधी मध्ये अधिकृत खरेदीदार (दुकान परवाना/लायसन,पॅन कार्ड,आधार कार्ड, फर्मच्या नावे बँक खाते इ.) यांचेकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल. तरी इच्छुक अधिकृत खरेदीदार फर्मधारक यांनी सदरील कालावधीत साहित्याची पाहणी करुन बंद लिफाफ्यामध्ये निविदा/दरपत्रके या कार्यालयास सादर करावे. सदरील साहित्याची सविस्तर यादी या कार्यालयाचे संकेतस्थळ WWW.PTCJALNA.COM वर दिनांक 15/07/2025 रोजी प्रसिध्द करण्यात येईल. यापुढील कालावधीमध्ये वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारी पत्रे,नोटीस, शुध्दीपत्रक हे सदरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. दरपत्रकामध्ये दर नमुद करतांना खालीलप्रमाणे नमुद करण्यात यावे.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | साहित्य खरेदीचा दर प्रकार प्रती कि.ग्रॅ./प्रती नग |
|---|---|---|
| 01. | स्टील साहित्य | प्रति कि.ग्रॅ. |
| 02. | सी.पी.यु. | प्रती नग |
| 03. | झेरॉक्स मशिन सॅमसंग,शार्प- छोटे,रिको- मोठे | प्रति नग |
| 04. | लाकडी + लोंखंडी मिक्स साहित्य | प्रती कि.ग्रॅ. |
| 05. | प्लास्टिक साहित्य | प्रती कि.ग्रॅ. |
| 06. | लाकडी साहित्य | प्रति कि.ग्रॅ. |
| 07. | संगणक मॉनिटर | प्रती नग |
| 08. | संगणक प्रिंटर (कॅनॉन 2900) | प्रती नग |
| 09. | AC लहान | प्रती नग |
| 10. | प्रोजेक्टर | प्रती नग |
| 11. | VCR | प्रती नग |
| 12. | कलर प्रिंटर | प्रती नग |
| 13. | वाद्य/बँड साहित्य | प्रती नग |

उपरोक्त नमुदप्रमाणे साहित्याच्या प्रकारानुसार जास्तीत जास्त दर असणाऱ्या खरेदीदार फर्मचा विचार करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी. सदर साहित्य निर्लेखन व विक्री करण्याच्या प्रक्रियेचे सर्व अधिकार, तसेच सदरील निर्लेखन प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रदद करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयाकडे राखुन ठेवण्यात येत आहेत. तसेच, कार्यालयातील अर्जाचे नोंदणी शुल्क रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) रोख स्वरुपात व EMD ( परतावा डिपॉजीट रक्कम) रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) धनाकर्षाद्वारे (DD) जमा करावी लागेल याची नोंद घ्यावी.

( अशोक बनकर )
प्राचार्य,
पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना.

# भांडार साहित्य जुने/निरुपयोगी, निर्लेखन/विक्री करण्याकरीता सूचना

पोलीस प्रशिक्षण केंद्र,जालना या कार्यालयातील जुने/निरुपयोगी/वापरण्यास अयोग्य स्थितीमधील साहित्य हे या कार्यालयाचे विविध शाखा,विभाग येथे खरेदीदार यांना पाहण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच साहित्याचे यादि या कार्यालयाचे संकेतस्थळ www.ptcjalna.com वर उपलब्ध करुन देण्यात येईल.

01. या कार्यालयाकडुन निर्लेखित करण्यात येणारे साहित्याच्या खरेदी प्रक्रियेमध्ये दरपत्रके/निविदा सादर करणारे खरेदीदार यांचेकडे संबंधित फर्मचा अधिकृत परवाना/लायसन,पॅन कार्ड,आधार कार्ड,फर्मच्या नावे बँक खाते इ. निकष पुर्ण असणे व दरपत्रकासोबतच सदरील आवश्यक कागदपत्रांच्या स्व:साक्षांकित छायांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील. तसेच अधिकृत खरेदीदार यांनीच सदरील खरेदी प्रक्रियेमध्ये आपला सहभाग नोंदवावा व त्यांचाच या खरेदी प्रक्रियेमध्ये प्राधान्याने विचार करण्यात येईल.

02. सदरील निर्लेखन प्रक्रिया कालावधीमध्ये या कार्यालयाकडुन देण्यात येणाऱ्या सूचना ह्या या कार्यालयाचे संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.

03. या निर्लेखन प्रक्रियेबाबत या कार्यालयाकडुन घालण्यात येणाऱ्या सर्व अटी व शर्ती लिखीत स्वरुपामध्ये देणे बंधनकारक राहील. तसेच नोंदणी फि रु.500/- (शासनास चलनाने जमा करण्यात येईल.) रोख स्वरुपामध्ये व अनामत रक्कम रु.10,000/- (अक्षरी रु. दहा हजार फक्त) चा डी.डी. व्दारे बंद लिफाफा पध्दतीने दरपत्रकासोबत जमा करणे बंधनकारक राहील. सदरील नोंदणी फि व अनामत रकमेचा डी.डी. जमा न करता खरेदी प्रक्रियेमध्ये सहभाग घेता येणार नाही.

04. सदरील निर्लेखित करावयाचे साहित्य पोलीस प्रशिक्षण केंद,जालना परिसरातील विविध विभाग, शाखा व इमारती येथे संबंधित खरेदीदार यांना पाहण्यासाठी दिनाक 15/07/2025 ते 30/07/2025 या कायावधीमध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सकाळी 11 वा. पासुन ते सायंकाळी 5.00 वा.पर्यंत उपलब्ध राहील.

05. सदरील साहित्य ज्या स्थितीमध्ये आहे,त्याच स्थितीमध्ये खरेदीदार यांस खरेदी करावे लागणार आहे. त्यामुळे पाहणी करतांनाच योग्य ती खबरदार घेऊनच दरपत्रकामध्ये दर नमुद करणे अपेक्षित आहे. त्यानंतर कोणतीही तक्रार, अडचण,समस्या याची दखल कार्यालयाकडुन घेतली जाणार नाही. ज्या खरेदीदाराचे दर जास्तीत जास्त राहील त्यांस सदरील साहित्य विक्री करण्यात येईल. एकदा दरपत्रक स्विकृत केल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही.

06. दरपत्रक/निविदा प्रक्रियेमध्ये ज्या खरेदीदार यांचे दर स्विकृत करण्यात येईल,त्याबाबत संबंधितांस लेखी कळविण्यात येईल. लेखी पत्र ज्या दिनांकास या कार्यालयाकडुन निर्गमित करण्यात येईल, त्या दिनांकापासुन (03) दिवसाचे आत सदरील साहित्य संबंधितांस स्व:खर्चाने ताब्यामध्ये घ्यावे लागेल.

07. सदरील साहित्याचे वजन इलेक्ट्रानिक वजन काट्यावर करुन एकुण वजनी प्रमाणामध्ये एकुण रक्कम तसेच प्रती नग प्रमाणे विक्रि करावयाचे साहित्याचे प्रती नग प्रमाणे एकुण रक्कम हि धनादेशाने किंवा ऑनलाईन पध्दतीने संबंधित खरेदीदार यांचे फर्मचे अधिकृत बँक खात्यामधुनच पोलीस प्रशिक्षण केंद्राचे आहरण व संवितरण यांचे बँक खात्याचे नाव - "P.A.TO Principal, PTS, Jalna" मध्ये जमा करणे बंधनकारक राहील.

08. सदरील विक्रीची एकुण अपेक्षित रक्कम जमा केल्यानंतर या कार्यालयाकडुन सदरील वस्तु घेऊन जाणेबाबत स्वतंत्ररित्या लेखी पत्राव्दारे कळविण्यात आल्यानंतरच निर्लेखित करावयाचे साहित्य घेऊन जाण्याची परवानगी राहील.

09. सदरील साहित्य पोलीस प्रशिक्षण केंद्र परिसरामधुन घेऊन जातांना प्रशिक्षण केंद्रास कोणतेही नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

10. सदरील खरेदी केलेल्या रकमेबाबत आवश्यक त्या सर्व शासकीय करांचा भरणा करणे, संबंधित खरेदीदार यांचेवर बंधनकारक राहील,त्या करांच्या रकमांचा भरणा केलेबाबतच्या पावत्या या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

11. ज्या खरेदीदार यांचे दर कमी असतील त्यांना अनामत रकमेचा डी.डी. परत केला जाईल.नोंदणी फि परत मिळणार नाही. सदरील नोंदणी फि शासनास चलनाने जमा करण्यात येईल.

12. उपरोक्त नमुद प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे शपथपत्र देणे बंधनकारक राहील.

( अशोक बनकर )
प्राचार्य,
पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना.